# ई - पोलीस पत्रिका

दि २२/०१/२०२० अनु.क्र.१८

## (अमरावती शहर पोलीसांची २०१९ ची उद्दिष्टे)

- जागरूक व तत्पर पोलीस.
- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू

# शिक्षा/निलंबन/पुन:स्थापना/बांक्षस

**१.क्रमांक :-पोआअ/विचौ-२/कसुरी/विनावेतन/आदेश/पोहवा-८३१ /पोहवा८३१ टेंभुर्णे +१/३५४ /२०२० अमरावती दिनांक. १५.०१.२०२०**

**आदेश**

**पोहवा/८३१ शेखर टेंभुर्णे, पो.स्टे.नांदगाव पेठ व पोहवा/२४ राजेश डहाके, पो.स्टे.वलगाव अमरावती शहर, तुमची दिनांक २८.१२.२०१९ चे २३.०० वा. ते दि.२९.१२.२०१९ चे ०५.०० वा.पावेतो कोतवाली लॉकअप गार्ड डयुटी लावण्यात आली असता** .सदर डयुटी चेकींग दरम्यान तुम्ही वरीष्ठांना कोणतीही पुर्वसुचना न देता अनधिकृतपणे स्वमर्जीने गैरहजर असल्याचे दिसुन आले आहे. सदरची बाब अतिशय गंभीर आहे

करीता तुमचा उपरोक्त गैरहजर कालावधी **दिनांक २९.१२.२०१९ रोजीचा ०१ दिवस विनावेतन मंजुर करण्यात येत आहे.**

०००

**२.क्रमांक :- पोआअ/विचौ-२/कसुरी/ गैरहजर /आदेश/पोशि-१८६२ धनकर/३६०/२०२० अमरावती दिनांक १५.०१.२०२०**

**आदेश**

पोशि १८६२ अमित धनकर , नेमणुक पोलीस मुख्यालय ,अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुम्ही दि.१०.१२.२०१९ ते दि.१३.१२.२०१९ रोजी पावेतो एकुण ०४ दिवस तुम्ही तुमच्या वरीष्ठांची पुर्वपरवानगी न घेता परस्पर स्वमर्जीने कर्तव्यावर गैरहजर राहीले असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची बाब अतिशय गंभीर आहे.

तुम्ही उपरोक्त प्रमाणे कर्तव्यावर अनधिकृतपणे गैरहजर राहुन बेशिस्तपणाची गैरवर्तणुक केली असल्याने तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील ) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **सक्त ताकीद** हि शिक्षा देण्यात येत आहे. तसेच तुमचा उपरोक्त गैरहजर कालावधी **दिनांक १०.१२.२०१९ ते १३.१२.२०१९ रोजी पावेतो एकुण ०४ दिवस (विनावेतन)** मंजुर करण्यात येत आहे.

०००

**३.क्र- पोआअ/विचौ-२/कसुरी/आदेश/पोशि-९९९ मेशकर/३६१/२०२० अमरावती दि.१५.०१.२०२०**

**आदेश**

तुम्ही पोशि/९९९ , गणेश मेशकर, नेमणुक पोलीस मुख्यालय ,अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुमची दिनांक. २६.१२.२०१९ चे २३.००वा. दि.२७.१२.२०१९ चे ०५.०० पावेतो ट्रेझरी गार्ड डयुटी लावण्यात आली असता ,चेकींगदरम्यान तुम्ही सदर डयुटीवर वरीष्ठांची पुर्वपरवानगी न घेता परस्पर स्वमर्जीने कर्तव्यावर गैरहजर असल्याचे निदर्शनास आले आहे . सदरची बाब गंभीर असुन शिस्तप्रीय पोलीस खात्यास अशोभनीय आहे.

करीता तुमचा उपरोक्तपणे गैरहजर कालावधी **दिनांक २७.१२.२०१९ रोजीचे ०१ दिवस (विनावेतन)** मंजुर करण्यात येत आहे.

०००

**( शुभांगी देशमुख)**
प्रभारी कार्यालय अधिक्षक
पोलीस आयुक्त,अमरावती शहर करिता

प्रत,

पत्रव्यवहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक , आस्थापना शाखा/ .सीसीटीएनएस कक्ष यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता .